जा.क्र.उमाशि-१/११वी प्रवेश/पुवि/२०१४-१५/ १४८२६
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दि. 2 5 JUN 2014

प्रति,

**सर्व झोन प्रमुख, झोन सहाय्यक, व पर्यवेक्षीय अधिकारी**
**इ.११ वी केंद्रिय प्रवेश प्रक्रिया, पुणे**
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र**

**विषय :- <u>इयत्ता ११ वी ऑनलाईन केंद्रिय प्रवेश प्रक्रिया सन २०१४-१५</u>.**

सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वी वर्गातील प्रवेश केंद्रिय प्रवेश समितीमार्फत ऑनलाईन पध्दतीने निश्चित केले जात आहेत. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा पहिला टप्पा आपल्या सहकार्याने अत्यंत यशस्वीरीत्या पूर्ण झालेला आहे. पहिला टप्पा पूर्ण करीत असताना आपण केलेले सहकार्य व योगदान यामुळेच हे शक्य झालेले आहे.

ऑनलाईन प्रवेश पक्रियेचा दुसरा टप्पा दि.२८.०६.२०१४ पासून सुरू होत असून सदर टप्पा सुलभरीत्या पूर्ण करण्यासाठी आपल्याकडून अशीच सहकार्याची अपेक्षा आहे. याबाबत पुढील नियोजन व क्षेत्रीय कामांची पध्दती तसेच वेळापत्रक निश्चित करण्यासाठी **दि. २७.०६.२०१४** रोजी **दुपारी ०३.००** वाजता **ए.व्ही.हॉल, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे** येथे सहविचार सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर सभेस उपस्थित राहताना आपल्या झोनमधील सदर प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील संगणकीय काम पाहणारी व्यक्ती यांनाही उपस्थित ठेवावे.

25/6/14.
**(सुमन शिंदे)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१ तथा**
**अध्यक्ष**
**इ.११वी केंद्रिय प्रवेश समिती, पुणे**